जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे मदत निधी सुपूर्द करताना विलो मॅथर अँड प्लॅट कंपनीचे अध्यक्ष हेमंत वाटवे. सोबत प्र-कुलुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहाला विलो मॅथर कंपनीकडून १३ लाखांचा निधी

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती वसतिगृहासाठी मूळ जर्मन व पुणे स्थित विलो मॅथर अँड प्लॅट पंप कंपनीमार्फत १३ लाख २१ हजार १७१ रुपयांचा निधी मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जलसमृद्धी व शुद्ध जलपुरवठ्यासाठी कार्यरत विलो मॅथर कंपनीसोबत शिवाजी विद्यापीठाचे जुने ऋणानुबंध आहेत. कंपनीस आवश्यकता भासल्यास विद्यापीठ ज्ञानाची देणगी देण्यास तत्पर असेल.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत वाटवे म्हणाले, सांडपाण्यावर प्रक्रिया करून दुर्गंधीमुक्त व पिण्यायोग्य पाणीनिर्मितीचे तंत्रज्ञान कंपनीने विकसित केले. या क्षेत्रामध्ये विद्यापीठासमवेत काम करायला निश्चित आनंददायी असेल. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी विद्यापीठातील उपक्रमांची माहिती दिली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर, उपकुलसचिव रणजित यादव, श्रीकांत शिरोडकर, नितीन असाळकर आदी उपस्थित होते.

20 MAR 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकस्मृती वसतिगृहाला विलो मॅथर कंपनीचे बळ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती वसतिगृहासाठी १३ लाख २१ हजार १७१ रुपये इतका निधी आज मूळ जर्मन असलेल्या पुणेस्थित विलो मॅथर अँड प्लॅट पंप प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने दिला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे मदतनिधी सुपूर्द करताना विलो मॅथर अँड प्लॅट कंपनीचे अध्यक्ष हेमंत वाटवे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आणि कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक हेमंत वाटवे यांनी लोकस्मृती वसतिगृहासाठी मदतनिधीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

हेमंत वाटवे म्हणाले, 'शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत संकल्पनांचा विकास करण्याच्या बाबतीत विलो मॅथर कंपनी बांधिल आहे. तदअनुषंगिक धोरणे आणि उत्पादने यासाठी आम्ही कार्यरत आहोत. निर्मिती-संगोपन आणि त्यानंतर समाजाशी तिची सांधेजोड या त्रयींवर आधारित कार्यप्रणाली आम्ही विकसित केली आहे. आमची संकल्पना अधिक यशस्वी होत जाते. यातूनच सांडपाण्यावर प्रक्रिया करून पूर्णतः दुर्गंधीमुक्त आणि जवळपास पिण्यायोग्य पाणीनिर्मितीचे तंत्रज्ञान आम्ही विकसित करू शकलो आहोत. या क्षेत्रामध्ये विद्यापीठासमवेत काम करायला निश्चित आनंद वाटेल.'

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, महादेव देशमुख, सागर डेळेकर, उपकुलसचिव रणजित यादव, विलो मॅथर अंड प्लॅट पंप कंपनीचे उपाध्यक्ष श्रीकांत शिरोडकर, नितीन असाळकर, प्रकल्प विक्रीप्रमुख सुधीर जोशी, सहयोगी उपाध्यक्ष मनोज बाफना, वितरणप्रमुख अनिल केसवानी, विभागीय व्यवस्थापक संजीव कुमार, उपप्रमुख विजयानंद सोनटक्के, मनुष्यबळ व्यवस्थापक संदीप सावंत उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
तरुण भारत

# वसतिगृहासाठी विलो मॅथर कंपनीकडून १३ लाखांचा निधी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे धनादेश सुपुर्द

कोल्हापूर : मूळ जर्मन असलेल्या पुणेस्थित विलो मॅथर अँड प्लॅट पंप प्रा. लि. या कंपनीमार्फत शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती वसतिगृहासाठी १३ लाख २१ हजार १७१ रुपये इतका निधी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. डॉ. शिर्के म्हणाले, लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहामुळे दात्यांच्या कृतज्ञ स्मृती विद्यार्थिनींसमवेत आयुष्यभर राहतील.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, जलसमृद्धी आणि शुद्ध जलपुरवठ्यासाठी कार्यरत विलो मॅथर कंपनीसोबत शिवाजी विद्यापीठाचे जुने ऋणानुबंध आहेत. कंपनीने विद्यापीठाला जल शुद्धीकरण यंत्रांचा पुरवठा केलेला आहे. आता देणगीतून हे बंध अधिक दृढ झाले आहेत. त्यासाठी कंपनीला आवश्यकता भासल्यास विद्यापीठ ज्ञानाची देणगी देण्यास सदैव तत्पर असेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक हेमंत वाटवे म्हणाले, शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत संकल्पनांचा विकास करण्याच्या बाबतीत विलो मॅथर कंपनी बांधील आहे.निर्मिती-संगोपन आणि त्यानंतर समाजाशी तिची सांधेजोड या त्रयीवर आधारित कार्यप्रणाली आम्ही विकसित केली आहे. त्यामुळेच आमची संकल्पना अधिक यशस्वी होत जाते. यातूनच सांडपाण्यावर प्रक्रिया करून पूर्णत: दुर्गंधीमुक्त आणि जवळपास पिण्यायोग्य पाणीनिर्मितीचे तंत्रज्ञान आम्ही विकसित करू शकलो आहोत. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी स्वागतकेले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी विद्यापीठातील विविध उपक्रमांची माहिती दिली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

20 MAR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकस्मृती वसतिगृहासाठी १३ लाखांचा निधी

कोल्हापूर : लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहामुळे दात्यांच्या कृतज्ञ स्मृती खऱ्या अर्थाने विद्यार्थिनींसमवेत आयुष्यभर राहतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. मूळ जर्मन असलेल्या पुणेस्थित विलो मॅथर अँड प्लॅट पंप कंपनीमार्फत शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती वसतिगृहासाठी १३ लाख २१ हजार १७१ रुपये इतका निधी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक हेमंत वाटवे हे शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी मदत निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठातील उपक्रमांची माहिती दिली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. डेळेकर, उपकुलसचिव रणजित यादव, श्रीकांत शिरोडकर, नितीन असाळकर, सुधीर जोशी, मनोज बाफना, अनिल केसवाणी, संजीव कुमार, विजयानंद सोनटक्के, संदीप सावंत आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
तरूण भारत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024

# आंतरराष्ट्रीय 'अन्वेषण' संशोधन स्पर्धेत सुरजित अडगळे द्वितीय



कोल्हापूरः आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेतील द्वितिय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना सुरजित अडगळे. सोबत डॉ. सिद्धेश्वर जाधव , राहुल जाधव आदी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संशोधक सुरजित अडगळे याच्या 'सिंथेसाइझिंग बायोप्लास्टीक अँड वेगन लेदर" या संशोधनास मूलभूत विज्ञान प्रकारामध्ये द्वितिय क्रमांक प्राप्त झाला. मुंबई विद्यापीठात नुकत्याच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धा पार पडल्या.

सुरजित अडगळे याने निवडुंगाच्या गरापासून जैविक प्लास्टीक आणि चामडे यशस्वीपणे बनवून या प्रकल्पाचे स्पर्धेत सादरीकरण केले.शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मधील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने भूषविले. डिसेंबरमध्ये विद्यापीठात ही स्पर्धा झाली. यात महाराष्ट्र व गुजरात राज्यांतील ११ विद्यापीठांचे १०६ संशोधक विद्यार्थी एकूण ६४ प्रकल्पांसह सहभागी झाले. शिवाजी विद्यापीठाचा सहा जणाचा संघ होता. या स्पर्धेत सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या सुरजित घन:श्याम अडगळे याला तृतीय क्रमांक मिळाला आणि त्याची पुढील स्पर्धांसाठी निवड झाली. यंदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा एकत्रितपणे मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आल्या. त्रिस्तरीय स्पर्धेत देशातील २८ विद्यापीठांतील एकूण १५७ विद्यार्थी सहभागी झाले. सुरजित अडगळे याच्या प्रकल्पाला मूलभूत विज्ञान गटात द्वितिय क्रमांक मिळाला. त्याला ५० हजार रूपये रोख बक्षिस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविले. यावेळी संघ व्यवस्थापक म्हणून राहुल जाधव, अन्वेषण समन्वयक म्हणून डॉ. सिध्देश्वर जाधव (विलिंग्डन कॉलेज, सांगली) उपस्थित होते. अडगळे यांच्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे..

20 MAR 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत सुरजित अडगळे द्वितीय

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संशोधक सुरजित घनश्याम अडगळे याच्या 'सिंथेसाइझिंग बायोप्लास्टीक अँड वेगन लेदर' या संशोधनास मूलभूत विज्ञान प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. मुंबई विद्यापीठात ही स्पर्धा झाली. सुरजितने निवडुंगाच्या गरापासून जैविक प्लास्टिक आणि चामडे यशस्वीपणे बनवून या प्रकल्पाचे स्पर्धेत सादरीकरण केले.

पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने डिसेंबरमध्ये भूषविले. त्यात महाराष्ट्र, गुजरात राज्यांतील ११ विद्यापीठांचे १०६ संशोधक विद्यार्थी एकूण ६४ प्रकल्पांसह सहभागी झाले. शिवाजी विद्यापीठाचा सहा जणांचा संघ होता. या स्पर्धेत सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या सुरजित अडगळे याला तृतीय क्रमांक मिळाला आणि त्याची पुढील स्पर्धांसाठी निवड झाली. यंदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा एकत्रितपणे ११ आणि १२ मार्च रोजी मुंबई विद्यापीठात झाली. त्यात सुरजित याच्या प्रकल्पाला मूलभूत विज्ञान गटात द्वितीय क्रमांक मिळाला. त्याला रोख ५० हजार रुपये, चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी संघ व्यवस्थापक म्हणून सांगलीतील विलिंग्डन कॉलेजचे राहुल जाधव आणि समन्वयक म्हणून डॉ. सिध्देश्वर जाधव उपस्थित होते.




कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना सुरजित अडगळे. सोबत डॉ. सिद्धेश्वर जाधव व राहुल जाधव.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024

पुढारी



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना सुरजित अडगळे. सोबत डॉ. सिद्धेश्वर जाधव, राहुल जाधव आदी.

# आंतरराष्ट्रीय 'अन्वेषण' स्पर्धेमध्ये विद्यापीठाचा सुरजित अडगळे द्वितीय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा संशोधक सुरजित अडगळे याच्या सिंथेसाइझिंग बायोप्लास्टिक अँड वेगन लेदर या संशोधनास मूलभूत विज्ञान प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. सुरजितने निवडुंगाच्या गरापासून जैविक प्लास्टिक व चामडे यशस्वीपणे बनवून प्रकल्पाचे स्पर्धेत सादरीकरण केले.

शिवाजी विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मधील पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा नुकत्याच झाल्या. स्पर्धेत सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या सुरजित अडगळे यास तृतीय क्रमांक मिळाला. त्याची पुढील स्पर्धांसाठी निवड झाली. यंदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा एकत्रितपणे ११ व १२ मार्च रोजी मुंबई विद्यापीठात झाल्या.

सुरजित याच्या प्रकल्पाला मूलभूत विज्ञान गटात द्वितीय क्रमांक मिळाला. त्याला ५० हजार रुपये रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी संघ व्यवस्थापक राहुल जाधव, अन्वेषण समन्वयक म्हणून डॉ. सिद्धेश्वर जाधव उपस्थित होते. अडगळे याच्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी अभिनंदन केले.

20 MAR 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘गुरू-शिष्य’ चित्रप्रदर्शनास रसिकांची दाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित ‘गुरू-शिष्य’ उपक्रमांतर्गत कला प्रदर्शनास रसिकांची दाद मिळत आहे. दि. १५ पासून सुरू असलेल्या या प्रदर्शनात मान्यवरांनी भेट देऊन कलास्वाद घेतला.



‘गुरू-शिष्य’ प्रदर्शनात ज्येष्ठांपासून नवोदितांपर्यंत विविध वयोगटांतील कलाकारांनी रेखाटलेल्या कलाकृती मांडण्यात आल्या आहेत. वास्तववादीपासून अमूर्तवादी कलाशैलीपर्यंतच्या कलाकृती या कलाकारांनी साकारल्या आहेत. निसर्गचित्रे, रचनाचित्रे, छायाचित्रे रसिकांना मोहित करत आहेत. यामध्ये विजय टिपुगडे, विलास बकरे, शिवाजी मस्के, मनोज दरेकर, संतोष पोवार, नागेश हंकारे, बबन माने, अभिजित कांबळे, प्रवीण वाघमारे, गजेंद्र वाघमारे, शैलेश राऊत, किशोर राठोड, राहुल रेपे, विजय उपाध्ये, अरिफ तांबोळी, प्रकाश मोहिते, नवज्योत काळे, सर्वेश देवरूखकर, पुष्कराज मेस्त्री, शुभम कुंभार, ओंकार कोळेकर, इंद्रजित बंदसोडे, पूनम राऊत, सुदर्शन वंडकर यांच्या कलाकृतींचा समावेश आहे. चार दिवसांत या प्रदर्शनास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, ‘दमसा’चे डॉ. विनोद कांबळे, प्राचार्य अस्मिता जगताप, चित्रकार संजय शेलार, सी. विष्णू, पार्श्वनाथ नांद्रे, सागर बगाडे, अशोक भोईटे, महेश पांचाळ, शिल्पकार सतीश घारगे, दीपक कांबळे, रोहन कुंभार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट दिली. हे प्रदर्शन दि. २१ मार्चपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
लोकमत



नाइट कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. विश्वनाथ मगदूम, प्र. प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे, प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन यश मिळवा

## व्ही. एन. शिंदे : पारितोषिक वितरण समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक वाटते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी सतत कार्यरत राहावे आणि उत्तुंग यश संपादन करावे, असा कानमंत्र शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिला. नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे आणि शहाजी लॉ कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील उपस्थित होते.

यावेळी शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि ट्रॅकसूट देऊन गौरवण्यात आले. राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत देदीप्यमान कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, प्रा. अभिजित कांबळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. एम. ए. जाधव यांनी पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांची नावे जाहीर केली. डॉ. अक्षता गावडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAR 2024
लोकमत

रवींद्र ओबेरॉय : पत्रकारिता व जनसंवाद विभागात आदरांजली

# नीना मेस्त्री-नाईक यांची निवेदनशैली अजरामर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आकाशवाणीच्या ज्येष्ठ निवेदिका नीना मेस्त्री-नाईक यांच्या आवाजात जादू होती. शब्दांत भावना ओतण्याची कला त्यांना अवगत होती. त्यांची निवेदनशैली अजरामर राहील, असा विश्वास ज्येष्ठ उद्योजक रवींद्र ओबेरॉय यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात नीना मेस्त्री-नाईक यांना अभिवादन करण्यासाठी शोकसभेचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचे संचालक डॉ. सुनील गायकवाड होते.



नीना मेस्त्री-नाईक यांना विद्यापीठात आदरांजली वाहिली. शोकसभेत रवींद्र ओबेरॉय यांनी भावना मांडल्या. यावेळी डॉ. सुनील गायकवाड, डॉ. प्रताप पाटील उपस्थित होते.

यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, मराठी विभागातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, लेखक डॉ. वसंत गायकवाड, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, नीना मेस्त्री यांचे पती अरूण नाईक, कन्या तन्वी नाईक, विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, मनीष आपटे, जयप्रकाश पाटील, डॉ. श्रीहरी देशपांडे, तेजस्विनी देसाई, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदींनी नीना मेस्त्री-नाईक यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या.

नीना मेस्त्री-नाईक यांनी नवख्या लेखकांना आकाशवाणीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी सतत मार्गदर्शन केले. त्यांची उणीव सर्वांनाच भासेल, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

20 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाची माहिती एका 'क्लिक'वर

## शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर साडेचार हजार प्रबंध उपलब्ध

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : संलग्नित महाविद्यालय आणि विविध अधिविभागांमध्ये सुरू असलेल्या पीएचडी., एम. फिल अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विविध विषयांवर सुरू असलेल्या आणि झालेल्या संशोधनाची माहिती शिवाजी विद्यापीठाने एका 'क्लिक'वर उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे विषयांची पुनर्रावृत्तीसह अन्य स्वरूपात विद्यार्थ्यांची होणारी अडचण दूर झाली आहे. पीजीबीयुटीआर विभागाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर साडेचार हजार प्रबंधांची माहिती उपलब्ध करून दिली आहे.

विद्यार्थ्यांना भेडसाविणाऱ्या अडचणीचे वास्तव 'सकाळ'ने 'संशोधन विषयांची माहिती मिळण्यात अडचण' वृत्तातून मांडली होती. त्याची दखल घेऊन विद्यापीठाने कार्यवाही करत त्याबाबतची माहिती उपलब्ध करून दिली आहे. पीएचडी., एम. फिल पदवी मिळाल्यानंतर संशोधकाच्या संशोधनाचा विषय, प्रबंध, कृती आराखडा आदी स्वरूपातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'शोध' या विभागात उपलब्ध होते. पण, सध्या ज्या विषयांमध्ये संशोधन सुरू आहे, ते कोण करत आहे, त्यांचा विषय कोणता आहे याबाबतची माहिती मिळत नव्हती. त्यामुळे एकच विषय दोन ते तीन विद्यार्थी संशोधनासाठी निवडले जाण्याचा प्रकार घडत होता. त्या विषयावर आधीच संशोधन झाले असल्याचे समजल्यानंतर ऐनवेळी विषय बदलावा लागत होता. त्याने वेळ खर्च होण्यासह मानसिक त्रास विद्यार्थ्यांना व्हायचा. ते टाळण्यासाठी विद्यापीठाने कार्यवाही करत संकेतस्थळावरील रिसर्च विभागात आता संशोधकाचे नाव, त्याचा विषय आदी माहिती उपलब्ध करून दिली आहे. गेल्या महिन्यापासून त्याची सुरुवात केली आहे, ही माहिती विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहे.

### नवसंशोधकांना माहिती मिळणे सोपे

नवीन संशोधकांना संशोधन विषय निवडण्यासाठी आणि नवसंशोधनासाठी विद्यापीठात सुरू असलेल्या संशोधनाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मिळावी. अधिविभागात लावण्यात यावी, अशी आमची मागणी होती. यावर विद्यापीठाने सकारात्मक चर्चा केली. सर्व विषयांची संशोधन यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. त्याने नवीन संशोधक, जिज्ञासू वाचकांना संशोधनाबाबतची माहिती मिळणे सोपे झाले असल्याची प्रतिक्रिया वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष युवराज कदम यांनी व्यक्त केली.

"विद्यापीठाच्या संकेतस्थळावर रिसर्च टॉपिक इन एसयुके या विभागात सन २०१७-१८ पासूनची संशोधक, मार्गदर्शकाचे नाव, विषय आदी माहिती दिली आहे. सध्या साडेचार हजार प्रबंधांची माहिती उपलब्ध आहे. पीएचडी., एम.फिलची नोंदणी आणि निकाल लागल्यानंतर ही माहिती अद्ययावत केली जाणार आहे.

**-व्ही. एस. सोयम,** उपकुलसचिव, पीजीबीयुटीआर विभाग

सकाळ IMPACT


शिवाजी विद्यापीठ : प्रत्येक विभागात फलक लावण्याची मागणी

संशोधन विषयांची माहिती मिळण्यात अडचण

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
तरुण भारत

# ‘महाराष्ट्र घडविणारी माणसं समजावून घ्या’

प्रतिनिधी
कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील हे नेते होते. त्यांचा राजकारणात आदरयुक्त दरारा होता. या नेत्यांनी महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण देशालाच दिशा देणाऱ्या अनेक योजना साकारल्या. त्यांच्या या कष्टातूनच आजचा महाराष्ट्र साकारला आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राला घडविणारी माणसं समजावून घेण्यास विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ‘लोकनेते बाळासाहेब देसाई आणि त्यावेळचा महाराष्ट्र’ हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. पाटणच्या मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराजे देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

मधुकर भावे म्हणाले, देसाई यांनी गृहमंत्री असताना मुंबईमध्ये गेट वे ऑफ इंडिया आणि शिवाजी पार्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभारले. शिक्षण मंत्री असताना अल्प-मिळकत गटातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्कात सवलत योजना सुरू केली. राजर्षी शाहू महाराजांनी वंचितांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना आदर होता. यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई यांना बी.ए.ची पदवी घेण्यासाठी साठ रुपये खर्च करून मुंबईला जावे लागले होते. तेव्हा कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ व्हायलाच हवे, याविषयी त्यांचा मनोदय पक्का झाला. यशवंतरावांना विद्यापीठ कराडला व्हावे, असे वाटे, तर वसंतदादांना ते सांगलीला व्हावे, असे वाटे. देसाई साताऱ्याचे असूनही विद्यापीठ कोल्हापूरलाच व्हावे, यासाठी आग्रही होते. यशवंतरावांनी त्यांना कोल्हापूरबद्दल अश्वस्त केले आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला स्थापन करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये बाळासाहेब देसाई यांनी अतिशय कळीची भूमिका बजावली.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ व्हावे, असे स्वप्न राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण बाळगून होते. बाळासाहेब देसाई हे त्यांचे विद्यार्थी. गुरूने पाहिलेले स्वप्न विद्यार्थ्याने तडीस नेल्याचे हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. आजच्या पिढीपर्यंत त्यांचे कष्ट आणि द्रष्टेपण पोहोचणे आवश्यक आहे. स्वागत व प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनिश पाटील यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्ता मचाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अरुण भोसले, व्ही. एस. पानस्कर, डॉ. ईस्माईल पठाण, डॉ. रणधीर शिंदे, दशरथ पारेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, देसाई कुटुंबिय, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
सकाळ

# 'भावनिक बुद्धिमत्ता'वर मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागात विविध कार्यक्रम झाले. डॉ. कुलकर्णी यांनी भावनिक बुद्धिमत्ता विषयावर मार्गदर्शन केले. प्राजक्ता पाटील यांनी नृत्य सादर केले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. कल्याणी कुलकर्णी प्रमुख उपस्थित, तर विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार अध्यक्षस्थानी होते. या वेळी डॉ. शिंदे यांनी महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. प्रा. वाय. एस. बोकील, आर. एम. जाधव, उदय घाटे, कानिफनाथ पंढरे, वीणा मालडीकर, प्रीती चव्हाण, आसावरी कागवाडे, वसंत सिंघण उपस्थित होते. सुषमा जाधव व तन्वी माने यांनी सूत्रसंचालन केले. गीतांजली खांडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAR 2024
पुढारी

# राजेंद्र चव्हाण यांना पीएच.डी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातून संशोधक विद्यार्थी राजेंद्र चव्हाण यांनी आंतरविद्याशाखा या विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले. चव्हाण यांनी 'डेव्हलपमेंट ऑफ रेमेडिअल प्रोग्रॅम फॉर कॉमन मिसकन्सप्शन्स इन बायोलॉजी अमंग इलेव्हन्थ स्टँडर्ड स्टुडंट्स-अ स्टडी' या विषयावर शोधप्रबंध शिक्षणशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. विद्यानंद खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. त्यांना प्रा. डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. चेतना सोनकांबळे आणि प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांचे मार्गदर्शन लाभले.